खा. कोर्टप्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** बिडकीन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0137 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/03/2025 23:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 11/03/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/03/2025 **Time (वेळ):** 22:36 बजे
(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 029
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2025 22:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी
(b) **Address (पत्ता):** बिडकीन **Beat No. (बिट क्र.):**

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महेश बाबासाहेब सोलाटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 31/05/1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | टाकाळी पैठण,पैठण,एमआईडीसी पैठण ,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | टाकळी पैठण,पैठण,वसंतनगर,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश काशीनाथ घावट | | | 1. ईसारवाडी,पैठण,एमआईडीसी पैठण ,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 40 भारतीय चलनी नोटा ज्यास एन्थ्रासीन | 20,000.00 |

कारवाई करावी हि विनंती आहे. माझ्या वरील कामाचे शासनास चलन भरल्याच्या पावत्या हजर करीत आहे. त्या तक्रारीवर मी व दोन्ही पंचांनी व पो.नि.केशव दिंडे साहेबांनी सहया केल्या. त्यावेळी माझ्या तक्रारीमधील कनिष्ठ अभियंता श्री. महेश घावट, नेम.उप विभाग, महवितरण कार्यालय, बिडकीन यांची तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

त्यानंतर दि.10/03/2025 रोजीच पो.नि.दिंडे साहेबांनी मला, दोन्ही पंच, सापळा टीम मधील सदस्यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने प्रक्रिया समजावुन सांगितली. त्यानंतर मार्गदर्शन करुन प्रत्येकांना सुचना दिल्या त्यावेळी सदर कारवाईत सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर बाबत माहीती दिली.

त्यानंतर सुरक्षित ठिकाणाहुन व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन, माझ्या अंगावरील कपडात लपवुन दिले व पंच क्र.1 कोलते यांना सोबत देऊन उप विभाग, महावितरण कार्यालय बिडकीन येथे लाचमागणी पडताळणी करीता माझ्याकडील खाजगी चारचाकी गाडीने दुपारचे 12.59 वाजता पाठविले. त्या प्रमाणे मी व पंच क्र.1 कोलते असे उप विभाग महावितरण कार्यालय बिडकीन येथे गेलो तेथे कनिष्ठ अभियंता श्री. महेश घावट यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना तक्रारीमधील कामासंबंधी बोललो की, बरं हे ते पाच हाईत पाच आपले आणं सहा..तुम्हाला म्हणलं होतनां आपल्या बहीणीचं हाय..मोबाईल आण ते आणलेले हाईत सोबत ओटीपीसाठी..त्यावेळी त्यांनी राहु दया ते..त्यावेळी मी नईना मंग त्याचसाठीच आलतो..मागच्या वेळेस काय झालतं..सोमवारी आलतो सगळं घेऊनच आलतो असे बोललो तर त्यांनी मी काय म्हणलं मला पाच प्रमाणे दया त्या दिवशी असे म्हणुन पाच हजार रुपये प्रमाणे पैशाची मागणी केली व आमचे सौर कृषी पंपाचे सगळे प्रकरण होल्ड असल्याचे सांगुन तुमच्यासाठी मध्यस्ती केल्याचे सांगितले त्यावेळी मी नई नई सांगा लगेच सांगा.. लगे आज सगळं हे ओटीपी ते देऊन लगे हे करुन टाकू आज असे बोललो तर त्यांनी बर साहेब नाही ना आज त्यावेळी मी फोनवर बोलुन घ्याताकां..बोललो तर त्यांनी फोनवर नाही बोलत साहेब.. पैशाचं..त्यावेळी मी मंग आता असे बोललो तर त्यांनी काय मंग सहज बोलणं झालं. तीस म्हणले होते त्या दिवशी.. नंतर पाच मी मनानं कमी केले..मी काय घरातुन टाकरणार हायका त्यावेळी मी पंचवीस हजार बोललो तर त्यांनी मला नाही वाटत याच्यात कमी करतेल..असे बोलले. त्यानंतर मी त्यांना प्रत्येकी 3 हजार प्रमाणे 18 हजार घेण्याची विनंती केली तर त्यांनी हे दोन हजार सुध्दा कमी नाही करणार प्रत्येकी आता..त्यावेळी मी परत 18 हजार घेण्याची विनंती केली त्यावेळी त्यांनी ही तुमची अपेक्षा आहे. असे बालुन ठिक आहे. मी बोलतो साहेबाना. साहेब हा म्हणले की, मग टेन्शन नाही. त्यावेळी मी साहेब येणार आहे का ? मग मी कधी येऊ ? त्यावेळी त्यांनी मी फोन करतोना, मग आपण निवांत भेटून घेऊ. तुम्ही, मी सांगीतल्यावर डॉक्युमेन्ट अपलोड करून घ्या. हा प्रिन्ट द्या मला, साहेबापासी नाही सापडल तर परत बर होईल मला असे म्हणुन माझ्याकडुन माझेकडील सौर कृषी पंपाचे कागदपत्र झेरॉक्स घेऊन टाकले.त्यावेळी मी साहेब उद्या राहातील का असे बोललो तर त्यांनी माझ बोलण झाल तर फोन करतो ना मी, कशाला चकरा मारता. त्यावेळी मी परत 18 हजारात करा असे बोललो तर त्यांनी बोलतो मी. पण थोड वनीस बीस झाल तर करा. मी मनान तुमचे पाच कमी केले बर. डायरेक्ली साहेबाला न बोलता. असे म्हणुन फोन करतो त्यावेळी या असे सांगितले त्यानंतर मी व पंच क्र.1 कोलते पो.नि.दिंडे साहेबांकडे परत आलो.

त्यानंतर पो.नि.दिंडे साहेबांनी पंच क्र.1 यांना व मला विचारणा केली त्यानंतर आम्ही वरील घटना सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वांनी व्हाईस रेकॉर्डर मधील माझे व कनिष्ठ अभियंता महेश घावट यांचेतील संभाषण ऐकले.

त्यानंतर आम्ही ऍ◌न्टी करप्शन ऑफीस, छ.संभाजीनगर येथे परत आलो. त्या ठिकाणी दिंडे साहेबांनी वरील घटनेचा सविस्तर पंचनामा केला. व ज्या वेळेस कनिष्ठ अभियंता महेश घावट हे फोन करुन बोलवितेल त्यावेळेस पुढील कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात येऊन मला सुचना दिल्या. त्यावेळी मी लाचेच्या रकमेचे 25,000/- रुपये ज्यात 500/- दराच्या 50 नोटा दिंडे साहेबांकडे हजर केल्या. त्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर मी घरी परत गेलो. व दि.11/03/2025 रोजी सकाळीच ऍन्टी करप्शन ऑफीसला येण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी दि.11/03/2025 रोजी सकाळी 09.00 वा.सुमारास हजर आलो. तेथे पोनि दिंडे, दोन्ही पंच, पथकातील सदस्य हजर असताना 09.53 वा.मला कनिष्ठ अभियंता महेश घावट यांचा यांचा फोन आला व त्यांनी मला टाकळी फाटयावर आल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना जामखेडला गेल्याचे सांगितले. त्यांवेळी त्यांनी आल्यावर फोन करुन भेटा असे सांगितले. त्यावेळी तो फोन कॉल मी माझे मोबाईल मध्ये रेकॉर्ड केलेला आहे. त्यावेळी आम्हा सर्वानुमते कनिष्ठ अभियंता यांनी बोलविल्यामुळे आजच पुढील सापळा कारवाईचे आयोजन केले.

त्यानंतर दिंडे साहेबांनी मला, दोन्ही पंच, पथकातील सदस्यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देऊन, मार्गदर्शन केले, ऍ◌न्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांची माहीती सांगुन प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर लाचेची रक्कम 25,000/- रुपये ज्यात 500/- रु.दराच्या 50 नोटांना पोअं/गाडेकर यांनी ऍन्थ्रॉसीन पावडर आम्हा सर्वांसमक्ष लावली व त्या नोटा माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवल्या. व

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | पावडल लागलेले | |

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

20,000.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि.11/03/2025

मी महेश बाबासाहेब सोलाटे, वय- 36 वर्ष, व्यवसाय शेती रा. टाकळी पैठण, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर,
मो.नं. 9921041129.
मी काल दिनांक 10/03/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.केशव दिंडे साहेब यांचेकडे पंचासमक्ष
माझ्या हस्ताक्षरात तक्रार दिली होती की, मी वरील प्रमाणे असुन शेती व्यवसाय करतो, माझी टाकळी पैठण गाव
शिवारात शेत जमीन आहे. त्या शेतात सौर कृषीपंप मिळणे करीता शासनाच्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजना
या मधुन माझ्या नावे, माझी पत्नी अर्चना, आई-सुनिता, भाऊ योगेश, भावजई अनुजा असे मिळुन 5 सौर कृषी पंप
मिळणे करीता ऑनलाईन अर्ज करुन त्याप्रमाणे शासनास ऑनलाईन पध्दतीने शासकीय फीस भरणा केलेली आहे.
तसेच माझे गावातील नातेवाईक भागचंद विश्वनाथ सोनवणे यांचेही कृषी सौर पंप मिळणे करीता आमचे सोबत अर्ज
करुन शासकीय फीस भरणा केली.
त्यानंतर सौर कृषी पंप योजनेच्या आमच्या पुढील कामासाठी महावितरण कार्यालयाची मंजुरी आवश्यक असल्याने
आमचे प्रकरण उप विभाग, महावितरण कार्यालय बिडकीन येथे प्रलंबीत होते. म्हणुन मी दिनांक 03/03/2025
रोजी उप विभाग महावितरण कार्यालय बिडकीन येथे गेलो तेथे कनिष्ठ अभियंता श्री. महेश घावट यांची भेट झाली.
त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुमच्या शेतात वीज असल्यामुळे तुम्हाला वरील सौर कृषी पंप पॅनल मंजुर होणार
नाहीत. जर मंजुर करायचे असेल तर प्रत्येकी 5 हजार रुपये असे एकुण 6 सौर कृषी पंप मंजुरीकरीता 30 हजार
रुपये साहेबांना दयावे लागतील. जर आम्ही नामंजुर केले तर कोणीही तुम्हाला सौर कृषी पंप देऊ शकत नाही असे
सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे ऊसाचे पैसे आल्यास येतो असे म्हणुन निघुन आलो.
त्यानंतर माझे घरगुती काम निघाले व मी देवदर्शनासाठी बाहेरगावी गेलो. तेथुन परत आल्यावर मी ॲन्टी करप्शन
ब्युरो छत्रपती संभाजीनगर यांचेकडे फोनवरुन माझी वरील पैसे मागण्याची तोंडी तक्रार सांगितली. व दिनांक
10/03/2025 रोजी सोमवारी पोलीस निरीक्षक केशव दिंडे साहेबांना मी बिडकीन येथे बोलविले. त्याप्रमाणे पो.नि.
केशव दिंडे साहेब, त्यांचे सोबत दोन पंच, त्यांची टिम असे बिडकीन जवळील फारोळा एचपी पेट्रोल पंपावर आले
तेथे मीही माझी चारचाकी खाजगी गाडी घेऊन हजर झालो. त्यावेळी पो.नि.दिंडे साहेब,दोन्ही पंच,पथक यांचेत व
आमचेत एकमेकांचा परिचय झाला. त्यावेळी मी त्यांना माझी वरील पैसे मागणी बाबतची तक्रार तोंडी सांगितली. व
माझे वरील कामाचे शासनास चलन भरल्याच्या पावत्या दाखविल्या त्यानंतर त्यांनी लेखी तक्रार देण्यास
सांगितल्यावरुन मी माझी सदरची तक्रार देत आहे.
माझी टाकळी शिवार, ता.पैठण येथे शेतजमीन आहे. त्यामध्ये आमचे 5 सौर कृषी पंप व नातेवाईक भागचंद
सोनवणे यांचे असे एकुण 6 सौर कृषी पंपाचे उप विभाग महावितरण कार्यालय बिडकीन येथुन मंजरी देण्याकरीता
प्रत्येकी 5 हजार रुपये असे एकुण 30 हजार रुपये पैशाची मागणी तेथील कनिष्ठ अभियंता श्री. महेश घावट हे करीत
असुन त्यांना माझ्या वरील कामासाठी पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांच्यात व माझ्यात पैश्याचा देण्या घेण्याचा
उसणवारीचा व्यवहार नाही. वैर दुश्मनी नाही.
तरी त्यांनी माझ्या वरील कामासाठी माझ्याकडे पैशाची मागणी करुन, स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर कारवाई
होणेस विनंती आहे. कनिष्ठ अभियंता श्री. महेश घावट यांना मी आज भेटायला जाणार आहे. तरी आज पुढील

त्यानंतर सापळा कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्याची पिशवी घेतली. त्यानंतर मी, पंच क्र.1 कोलते, सापळा
पथकातील सदस्य असे माझे खाजगी चारचाकी गाडीत व पोनि दिंडे व पंच क्र.2 सापळा पथकातील एक सदस्य
दिंडे साहेबांच्या खाजगी चारचाकी गाडीत असे आम्ही ऍन्टी करप्शन ब्युरो छत्रपती संभाजीनगर येथुन दि.
11/03/2025 रोजी सकाळी 10.45 वाजता निघुन झाल्टा फाटा-छत्रपती संभाजीराजे कारखानाजवळुन-कचनेर-
पोरगांवफटा-निलजगांव मार्गे बिडकीन येथे जात असताना महेश घावट यांना मी फोन करुन कोठे यायचे हे विचारले
तर त्यांनी त्यांचे कार्यालयात बोलविले. त्याप्रमाणे आम्ही बिडकीन येथे गेलो. तेथे माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डरमध्ये
नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावरील कपडयांमध्ये लपवुन दिला. व पंच क्र.1
कोलते यांना माझ्या सोबत देऊन लाचेची रक्कम देण्याकरीता उप विभाग महावितरण बिडकीन कार्यालयात 12.02
वा.पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे तेथे जाऊन कनिष्ठ अभियंता महेश घावट यांची भेट घेतली. त्यावेळी
त्यांनी काय होत जामखेड ला असे म्हणुन मी जामखेडला गेल्याविषयी चर्चा केली. त्यानंतर आम्ही चर्चा करत उप
विभाग महावितरण बिडकीन कार्यालयाचे समोरील रोडच्या पलीकडील रसवंतीवर मी, पंच क्र.1 कोलते व कनिष्ठ
अभियंता महेश घावट असे गेलो तेथे उसाचा रस घेतला. व रसवंतीच्या बाहेर उभा राहिलो त्यावेळी मी वाहुळे साहेब
आले का असे विचारले असता महेश घावट यांनी हा..बोललो मी कालच बोललो मी रात्री.. ते म्हणी वीस तरी घेवुन
टाका आता याच्या खाली नका बोलु म्हणी त्यावेळी मी त्यांना हां..हां..जाऊ दया असे म्हणलो. त्यावेळी त्यांनी
संध्याकाळी मी बसलो का तुम्हाला फोन करतो..मग आपण अपलोड करु ते त्यावेळी मी त्या सी.एस.सी वाल्याकडे
जाऊ का काय. त्यावेळी त्यांनी नाही तर मग सात बारे आसल तर पी.डी.एफ टाका मी तुम्हाला अपलोड करुन देतो
फक्त ओटीपी दयावे लागेल प्रत्येक मोबाईल वर ओटीपी येतो. त्यावेळी मी वाहुळे साहेबांना भेटायचं का असे विचारले
तर त्यांनी नाही.. बोललो मी असे म्हणुन त्यांचे कार्यालयातुन सौर कृषी पंपाचे अप्रोल झाले की मॅसेज येईल त्यानंतर
कंपनी चॉईस करायची असे सांगितले. त्यानंतर सोलारच्या कंपनीविषयी चर्चा झाली. त्यानंतर हे देऊ का तुम्हाला
असे विचारले तर त्यांनी हां..देऊन टाका असे बोलले त्यावेळी मी माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुचे समोरील
खिशातील ऍन्थ्रॉसीन लावलेल्या 500/- रुपयांच्या 50 नोटा नोटांमधील 10 नोटा काढुन त्यांनी वर 20 हजार
रुपयाचे कमी न घेण्याचे सांगितल्याने त्यांना 40 नोटा असे 20,000/- रुपये पंचासमक्ष समारे धरले असता महेश
घावट यांनी त्यांच्या डाव्या हाताने पंचासमक्ष स्वत: स्विकारुन त्यांच्या अंगातील पॅन्टच्या डावे बाजुचे समोरील
खिशात ठेवुन दिली. त्यावेळी मी त्यांना वीस हजार आहे असे बोललो.
टीप- सीसीटीएनएस संगणकप्रणाली मध्ये 8000 अक्षरांची मर्यादा असल्याने फिर्यादीतील पुढील मजकुर स्वतंत्र
पानावर जोडण्यातआला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): NILESH SHIVAJI SHELKE(SI (Sub-Inspector)) / 15101000402NSSM8801F

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): **or** (किंवा)

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

11.3.25

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NILESH SHIVAJI SHE
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402NSSM880

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)

त्यावेळी त्यांनी **जाऊ दया आता काय** असे बोलले. मी त्यांना ते याला भेटायच काम नाही ना आता...तुमच्या लाईनमनच काही राहीन का त्याला बी दयावे लागेन का असे बोललो तर त्यांनी **थोडेफार देवुन टाकायच ...काय तुमच्या हिशोबाने चहापाण्याला त्याचं काय आपलं** असे बोलले त्यावेळी मी परत वाहुळे साहेबांच परत काही नाही व्हायला पाहीजे आता त्यावेळी त्यांनी **वाहुळे साहेबांच नाही आता काही** त्यावेळी मी हा ठीक हे मग आम्ही निघावा मग असे बोललो तर त्यांनी **चालल...फक्त मी फोन केल्यानंतर डाक्युमेन्ट अपलोड करा असे बोलले** त्यावेळी आम्ही आता निघणार असल्याने मी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा म्हणुन मी माझ्या डाव्या हाताने माझ्या अंगातील पॅन्टच्या डावे बाजुचे पाठीमागील खिशातील हात रुमाल काढुन कपाळ पुसणे असा केला. ती वेळ दुपारी 12.25 वाजेची होती.

त्यावेळी तात्काळ पो.नि.दिंडे साहेब, त्यांच्या सापळा टीम व पंच क्र.2 हे तात्काळ हजर आले व त्यांनी महेश घावट, कनिष्ठ अभियंता यांना विचारपुस करुन मी दिलेल्या लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. व माझ्याकडील व्हाईस रेकॉडर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. महेश घावट यांना परिचय देऊन त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव महेश काशिनाथ घावट, वय 35 वर्ष, कनिष्ठ अभियंता, नेम.उप विभाग महावितरण कार्यालय बिडकीन रा.ईसारवाडी ता.पैठण असे सांगितले. त्यानंतर पो.नि.दिंडे साहेबांनी त्यांची पुढील कार्यवाही केली. त्यानंतर आम्ही ॲन्टी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर येथे परत आलोत. त्यावेळी मी ॲन्टी करप्शन ऑफीसच्या बाहेर उभा असताना महावितरण कार्यालयाच्या कर्मचारी यांनी मला याला एखादया खोटया गुन्हयात अडकू व ॲन्टी करप्शनच्या लोकांना पाहुन घेऊ असे म्हणले. त्या

कर्मचारी यांची मला ओळख नसल्याने त्यांची नावे मला माहीत नाहीत.

तरी महेश काशिनाथ घावट, वय 35 वर्ष, कनिष्ठ अभियंता, नेम.उप विभाग महावितरण कार्यालय बिडकीन रा.ईसारवाडी ता.पैठण यांनी माझ्या शेतीतील 5 सौर कृषी पंप व नातेवाईक भागचंद सोनवणे यांचा 1 सौर कृषी पंप असे एकुण 6 कृषी सौर पंपाचे मिळुन 25,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष दि.11/03/2025 रोजी 12.25 वा. उप विभाग,महावितरण कार्यालय बिडकीनच्या समोरील रेहान कुल पॉईंट ॲन्ड रसवंती येथे पंचासमक्ष स्वत: स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरील फिर्याद ही मराठीत संगणकावर माझे सांगणे प्रमाणे टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही.

11.3.25

HC 1114

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)